# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



संजय साबळे 8208137064 / 9921661173
विकी साबळे 8208068315
प्रिती नर्सरी अँन्ड लॉन सप्लायर्स
आमच्याकडे सर्व प्रकारचे शोभीवंत इनडोअर आऊटडोअर प्लॅन्टस तसेच लॉन मिळेल
पुणे – सोलापुर रोड, काळभोर लॉन्सच्यापाठीमागे, कवडीगाव रोड, ता. हवेली, जि. पुणे.



लातूर वर्ष ४ थे अंक २९२ वा मंगळवार दि.२० मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# व्ही एस पँथर्स आयोजित सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा थाटात संपन्न



व्ही एस पँथर्स आयोजित सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा थाटात संपन्न

लातूर:लातूर येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४ व्या जयंतीनिमित्त सहाव्या सर्वधर्मीय सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. या दिमाखदार सोहळ्यात ३८ जोडपी विवाहबद्ध झाली. यामध्ये मुस्लिम धर्मीय दोन ,हिंदू धर्मीय ११ आणि बौद्ध धर्मीय २५ जोडपी होती ,या विवाह सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये एक पूर्णतः अंध जोडपे होते . या विवाहसोहळ्यामध्ये सर्व जोडप्याचा विवाह त्यांच्या त्यांच्या धार्मिक विधी नुसार करण्यात आला. बौद्ध धर्मियांचा विवाह संपन्न करण्यासाठी पूजनीय भन्ते डॉ उपगुप्त थेरो, भन्ते महाविरो बौद्धांचार्य केशव कांबळे, असित कांबळे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच हिंदू धर्मियांचा विवाह पुरोहितांच्या हस्ते संपन्न करण्यात आला तसेच मुस्लिम धर्मियांचा विवाह काजी नी संपन्न केला. या सर्व धर्मीय समुद्र विवाह सोहळ्यामधील नवदांपत्यांना शुभाशीर्वाद प्रदान करण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष श्रद्धेय भीमराव आंबेडकर साहेब, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा निलंगा चे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर ,आमदार अभिमन्यू पवार, शिक्षक आमदार विक्रमजी काळे ,माजी मंत्री विनायकरावजी पाटील, माजी माजी खासदार सुनील गायकवाड, माजीआमदार शिवाजीराव पाटील कवेकर, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव बेंद्रे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव कांबळे, माजी महापौर अख्तर मिस्त्री ,,प्रसिद्ध सीए सचिन शिंदे, भाजपा नेत्या प्रेरणा होनराव, माजी नगरसेविका रागिनी यादव, वंचित चे महासचिव रमेश गायकवाड ,वंचित जिल्हाध्यक्ष सलीम सय्यद सचिन लामतुरे, वंचितच्या महिला शहराध्यक्ष सुजाता ताई अजनी कर, एडवोकेट विनोद मुळे, एडवोकेट रुपेश थोरमोटे ,एडवोकेट सचिन जावळे, पत्रकार दीप रत्न निलंगेकर, हणमंत राचट्टे, विकास नरहारे ,दर्शन मसलेकर ,अफजल कुरेशी एम आय एम चे बरकत काजी ,पंकज शिंदे, एडवोकेट सचिन कांबळे, माजी नगरसेवक अजित पाटील कवेकर ,नेताजी बादाडे, महेश काळे ,चंदू बगडे सह आदी मान्यवर उपस्थित होते . समारोहाच्या सुरवातीला भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा संघटनेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला .

यानंतर संघटनेचे मार्गदर्शक रवि कुरील यांनी प्रस्तविकाच्या माध्यमातून संघटनेच्या विविध सामाजिक उपक्रमांची आणि संघटनेने केलेल्या विविध आंदोलनाविषयी, मोर्चा विषयी माहिती दिली यानंतर सं अध्यक्ष विनोद खटके यांनी सांगितले की माझ्या संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा प्रचंड मेहनतीतून हा विवाह सोहळा संपन्न होत आहे , चांगले काम करत असताना चांगल्या कार्याला मदत करणारे खूप दानशूर लोक मला या कार्यात मदत करतात ,शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना मान्यवरांची कशी मदत होते हे देखील उदाहरण देऊन सांगितले आज घडीला संघटनेच्या वतीने १०० जोडपी विवाहबद्ध करण्याची क्षमता प्राप्त झाली आहे असे सांगितले .यानंतर संभाजीराव पाटील यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले यांनी नेहमीच आपल्या सोबत राहू असे आश्वासन दिले यानंतर अभिमन्यू पवार यांनी व्ही एस पँथर्स च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या यानंतर शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी देखील या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.यानंतर श्रद्धेय भीमराव आंबेडकर यांनी व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एवढा स्तुत्य उपक्रम राबवून गरीब पालकांची मदत करीत आहात या बद्दल खूप खूप कौतुक केले . मान्यवरांच्या मनोगतनंतर सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचा विवाह विधी संपन्न करण्यात आला. यावेळी संघटनेच्या वतीने नवदांपत्यांना मनी मंगळसूत्र जोडवे विवाहसाठी लागणारे पोशाख गादी पलंग संसार उपयोगी साहित्य प्रदान करण्यात आले तसेच विवाह सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या वराडी मंडळीसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यासाठी संघटनेने निर्माण केलेल्या विविध समित्यांनी आपले कार्य चोख पार पाडले. या सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके आणि प्रदेशाध्यक्ष सचिन भाऊ मस्के यांच्या नेतृत्वाखाली मार्गदर्शक संतोष मांदळे, रवी कुरील, संपर्कप्रमुख आनंद जाधव, ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे, मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे, जिल्हाध्यक्ष शरद किणीकर ,समिती कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ ,ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे ,विधी विभाग जिल्हाध्यक्ष एडवोकेट प्रतीक कांबळे, ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी ,शहराध्यक्ष असच शेख, औसा तालुका अध्यक्ष सुनील सातपुते चाकुर तालुका अध्यक्ष अजय वाघमारे ,निलंगा तालुकाध्यक्ष दाजी कांबळे, रेनापुर तालुका अध्यक्ष राज तर कसे, लातूर तालुका अध्यक्ष बंटी कांबळे, ग्रुप तालुका अध्यक्ष सुनील आदमाने, ग्रुप शहराध्यक्ष संतोष जाधव, सुरज सूर्यवंशी, गौसभाई शेख, अतुल होळकर, मनोज गायकवाड, ऑटो युनियन शहराध्यक्ष शाहरुख मणियार, उपाध्यक्ष जगदीश सरवदे ,ऑटो युनियन जिल्हा उपाध्यक्ष विलास कसबे ,जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड, यासीन शेख, रमजान शेख, सज्जन शेख सिद्धार्थ वाकचौरे ,विनोद वाघचौरे विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे, पंकज पाचपिंडे ,कामगार आघाडीचे हुसेन मादळे, रवी कांबळे, विकी खटके ,गोपाळ कांबळे , गिरीश पवार ,अजय सूर्यवंशी ,साईनाथ कांबळे, बबलू जोगदंड , विजय करवंजेआदींनी परिश्रम घेतले.

# ना.अजितदादांचे घड्याळ प्रा.ईश्वर मुंडे यांच्या हातात

केज/प्रतिनिधी बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेछा सेवानिवृत्ती घेतलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात धारूर तालुकाध्यक्ष,ओबसी सेल प्रदेश सरचिटणीस व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी सेल प्रदेशाध्यक्ष या पदांवर प्रभावीपणे कार्य केले.

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या विजयात प्रा.ईश्वर मुंडे यांचा मोलाचा वाटा होता.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्यासोबत राहणे पसंद केले.

खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील यांच्या संम्मतीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ लढविण्यासाठी बीड जिल्ह्यात जन संपर्क वाढवला होता परंतू शेवटच्या टप्प्यात खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना माघार घ्यावी लागली होती.

या वेळी प्रा.ईश्वर मुंडे यांनी समाजाचा रोष पत्करून पक्षाचे उमेदवार खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा प्रचार केला होता.

नंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी विधानसभा निवडणुक २०२४ साठी माजलगाव मतदारसंघाचा निवडणुक पुर्व जन संपर्क दौरा पूर्ण केला होता. या वेळेला ही मोहनराव जगताप यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना संधी मिळाली नाही.

या नाराजीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी माजलगाव विधानसभेची निवडणूक अपक्ष लढवून रंगत आनली होती परंतू शेवटच्या टप्प्यात आ.जयंतराव पाटील यांच्या विनंतीवरून खा.सुप्रीयाताई सुळे यांच्या माजलगाव येथील जाहीर प्रचार सभेत पक्षाचे उमेदवार मोहनराव जगताप यांना पाठींबा देवून त्यांच्या विजयासाठी प्रयत्न केले होते.

आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजलगाव मतदारसंघ व बीड जिल्ह्यात प्रमाणीक पणे केलेले काम खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील यांना वास्तव सांगणारे मोठया मनाचे नेतृत्व बीड जिल्ह्यात नसल्यामुळे व पक्ष संघटनेपेक्षा स्वत:ची मानसे निर्माण करण्याचे राजकारण बीड जिल्ह्यात सुरू असल्यामुळे आपण खा.शरदचंद्र पवार साहेब यांना सोडून जड अंत:करणाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर आबा चव्हाण यांच्या विनंतीवरून रमेशराव आडसकर यांच्यासोबत वानखडे स्टेडियम, मुंबई येथे ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ना.अजितदादा पवार, खा.सुनीलराव तटकरे यांच्या हस्ते पक्षात प्रवेश केला असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी केज येथील पक्ष नोंदणी कार्यक्रमात आपल्या भाषणात सांगितले.

पुढे बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,रमेशराव आडसकर हे कार्यकर्त्यांना पद व प्रतिष्ठा मिळवून देणारे नेते आहेत या मुळे आपण त्यांच्या नेतृत्वाखालील पक्ष वाढीचे काम करून सर्व नव्या जुन्यांना सोबत घेऊन जन हिताची कामे करत राहणार आहोत.

यावेळी स्टेजवर रमेशराव आडसकर,ड.राजेश्वर आबा चव्हाण,अंकुशराव इंगळे,दिलीप गुळभिले,ऋषिकेश आडसकर,राजाभाऊ औताडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# अमित शहा यांची भेट घेऊन डॉ. अर्चना पाटील चाकूरकरांनी लातूरसाठी पॅरामिलिटरी प्रशिक्षण केंद्राचा मुद्दा पुढे रेटला

लातूर :– केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भाजप नेत्या आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी रविवारी नवी दिल्लीत भेट घेतली. सुमारे तासभर चाललेल्या या चर्चे त देशाच्या सुरक्षाविषयक घडामोडी, 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय लष्कराने केलेल्या शौर्यपूर्ण कामगिरीचे अभिनंदन तसेच लातूर जिल्ह्यात प्रस्तावित पॅरामिलिटरी प्रशिक्षण व फायर–फायटिंग रेंजचा प्रलंबित प्रस्ताव आदी मुद्द्यांचा समावेश होता, अशी माहिती त्यांनी त्यांच्याशी संपर्क केला असता दिली. २००७–०८ मध्ये तत्कालीन गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या कार्यकाळात लातूर जिल्ह्यात पॅरामिलिटरी दलांसाठी समर्पित फ्री फायर–फायटिंग रेंज व प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे सर्वेक्षण झाले होते. तांत्रिक मान्यतेच्या अंतिम टप्प्यावर असताना प्रस्ताव प्रलंबित राहिला. हा प्रस्ताव तातडीने पुनरावलोकन करून अंमलात आणावा, अशी विनंती डॉ. चाकूरकरांनी अमित शहांना केल्याचे त्यांनी सांगितले लातूर येथील केंद्रीय राखीव पोलीस दल तसेच चाकूर येथील सीमा सुरक्षा दल छावणीला प्रत्यक्ष भेट देण्याची मागणीही त्यांनी केली. या छावण्यांत नवी प्रशिक्षण साधने व निवासी सुविधा उभारल्यास स्थानिक युवकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील, असे डॉ. चाकूरकरांनी सांगितले ऑपरेशन 'सिंदूर'बद्दल भारतीय लष्कराचे अभिनंदन करताना त्यांनी लिहिले, ही कारवाई केवळ सीमांची सुरक्षा नव्हे, तर भारताच्या जागतिक सामर्थ्याची ठसठशीत घोषणा आहे. त्यांच्या मते, लातूरमध्ये प्रस्तावित पॅरामिलिटरी रेंज हा जिल्ह्याच्या आर्थिक–



सामाजिक प्रगतीसाठीही महत्त्वाचा टप्पा ठरेल. गृह मंत्रालय लवकरच प्रस्तावाचा अद्ययावत खर्च व तांत्रिक व्यवहार्यता अहवाल मागवणार असून, राज्य सरकारच्या सहकार्याने जमीन अधिग्रहण व पायाभूत सुविधांच्या निर्णयांना गती देण्याचा विचार आहे, असेही त्यांनी यावेळी बोलत असताना अधोरेखित केले

# रेणापूर परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस; आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून नुकसानीची पाहणी

लातूर : – अचानकपणे विजेचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह जोरदार गारांचा पाऊस रविवारी सायंकाळी झाला यामुळे रेणापूर तालुक्यातील मौजे गव्हाण, इंदरठाणा परिसरात मोठे नुकसान झाले या नुकसानीची लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी दुपारी पाहणी करून नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत आणि नुकसान ग्रस्तांना शासनाच्या वतीने मदत मिळवून द्यावी अशा संबंधितांना सूचना दिल्या.





रेणापूर तालुक्यातील काही भागात रविवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह जोराचा वादळ वारा होऊन जोरदार अवकाळी पाऊस झाला. गारांचाही सडाका पडला यामुळे अनेक ठिकाणी विजेच्या तारा तुटल्या, पोल तुटून पडले, डिपी उध्वस्त झाल्या, पत्रे उडाली, गव्हाण येथे अनेक घरांचे मोठे नुकसान झाले, इंदरठाणा येथे शेतात वीज पडून शेतगड्याचा दुर्दैवी अंत झाला. सदरील नुकसानीची माहिती मिळाल्याने लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी दुपारी नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायतराज सेल जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष शरद दरेकर, सतीश आंबेकर, दशरथ सरवदे, अभिषेक अकनगिरे, कुलदिप सूर्यवंशी, श्रीकृष्ण पवार यांच्यासह अधिकारी कर्मचारी होते.

वादळ वाऱ्यात घरावरील पत्रे उडून घरातील सर्व संसार उपयोगी साहित्य, धान्याचे नुकसान झालेल्या गव्हाण येथील दयानंद ज्ञानोबा पवार आणि सुमनबाई भाऊसाहेब पवार यांच्या घराची पाहणी करून वैयक्तिक आर्थिक मदत केली. त्याचबरोबर सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत नुकसानग्रस्त नागरिकांना शासनाच्या वतीने मदत मिळवून द्यावी. इंदरठाणा येथील मयत शेतगडी गुणाजी कदम यांच्या परिवारास गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेतून मदत करावी अशा सूचना आ. कराड यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी गटविकास अधिकारी सुमित जाधव, नायब तहसीलदार रामेश्वर स्वामी, कृषी अधिकारी नितीन कांबळे, मराविमचे उप अभियंता काळे, मंडल निरीक्षक एस ए गायकवाड, तलाठी डी आर मोरे, त्याचबरोबर गव्हाण इंद्रठाणा परिसरातील वाजीद शेख, शिवमूर्ती उरगुंडे, बाळू कटके, परमेश्वर जाधव, दिनकर राठोड, पृथ्वीराज उरगुंडे, उज्वल कांबळे, उत्तम राठोड, गुणवंत जोगदंड, बालासाहेब माने, देवानंद शिंदे, बालासाहेब बरीदे, सुभाष रायनूळे, गणपत पवार, काशीराम पवार, राम बरीदे, जगनाथ पवार, भारत वाघमारे, जनार्धन पवार, बळीराम बरीदे, विजयकुमार पवार शहाजी पवार शिवाजी पवार यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने होते.

# पानगाव ते खरोळा पाटी दरम्यानच्या ४२.५० कोटी रुपये खर्चाच्या

लातूर : – पानगाव ते खरोळा पाटी दरम्यानच्या १४.२० किलोमीटर रस्त्याच्या कामाला लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून पुर्नमंजुरी मिळाली असून त्यात ४ किलोमीटर सिमेंट काँक्रेट आणि १० किलोमीटर डांबरीकरण करण्यात येणार असून या कामासाठी तब्बल ४२ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. वाहनधारकासह नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असून सदरील रस्त्याचा नव्याने प्रस्ताव मंजूर करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचे अनेकांनी आभार व्यक्त केले आहेत.



रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव ते खामगाव या राष्ट्रीय महामार्गाला २०१८ मध्ये मंजुरी मिळाली होती मात्र पानगाव ते खरोळा पाटी दरम्यान रस्त्यालगतच्या काही शेतकऱ्यांनी अडचणी निर्माण केल्याने या मार्गाचे काम रखडले होते. नागरिकांची अडचण आणि गैरसोय लक्षात घेऊन शासनाने नव्याने मंजुरी देऊन गेल्या २०२४ मध्ये सिमेंट काँक्रेट रस्त्याच्या कामाला आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. रस्त्याच्या प्रश्नी काही शेतकरी न्यायालयात गेले त्यांची बाजू ऐकून जुन्या काळात असलेल्या रस्त्याच्या रुंदीप्रमाणे काम करावे अशा सूचना न्यायालयाने रस्ते महामार्ग विभागाला केल्या. जुन्या काळात अस्तित्वात असलेला रस्ता अरुंद असल्याने सिमेंट काँक्रेटचा रस्ता करणे शक्य नसल्याने पुन्हा एकदा या रस्त्याचे काम बंद पडले.

पानगाव ते खरोळा पाटी दरम्यानच्या बंद पडलेल्या रस्त्याच्या कामाचा सिमेंट काँक्रीट ऐवजी डांबरीकरणाचा नव्याने प्रस्ताव तयार करून तात्काळ दाखल करा अशी सूचना विशेष बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना केल्या होत्या. सदरील प्रस्तावास मंत्री महोदयासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून, बोलून लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी नव्या प्रस्तावास तातडीने मंजूरी मिळावी यासाठी प्रयत्न केले त्यांनी केलेल्या प्रयत्नाला यश आले असून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मुंबई येथील प्रादेशिक कार्यालयाने पानगाव ते खरोळा पाटी दरम्यानच्या रस्त्याच्या पुर्नमंजुरीचा शासनाचा अध्यादेश काढला आहे. शासनाच्या या निर्णयानुसार महामार्गाच्या एकूण १४.२० किमी लांबीच्या रस्त्याला मान्यता देण्यात आली आहे त्यात पहिल्या ४ किमी लांबीमध्ये काँक्रीट रस्ता तर उर्वरित १० किमी लांबीमध्ये डांबरीधावपट्टीचा रस्त्याला मंजूरी मिळाली आहे. या कामासाठी एकूण ४२ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत.

रस्त्याचे काम रखडल्याने पानगाव शहर आणि आजूबाजूचे गावातील व्यापारी वाहनधारकासह नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. बंद पडलेले रस्त्याचे काम पुन्हा सुरू व्हावे यासाठी नव्याने प्रस्ताव दाखल करून हा प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी संबंधिताकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांचे अनंत चव्हाण, सतीश आंबेकर, सुकेश भंडारे, गणेश तूरूप, मीनाताई मोटाडे, श्रीकृष्ण जाधव, शिवाजी जाधव, सुंदर घुले, माधव घुले, योगीराज शिरसाट, अमर चव्हाण, गोपाळ शेंडगे, लक्ष्मण यादव, मारुती गालफडे, नाथराव गीते, परिचित सुडे, बाबाराव कांदे, ओमप्रकाश जटाळ, बालासाहेब शिरसाठ, बालाजी खरोळे, दत्तू चव्हाण, रामभाऊ लोमटे, पुंडलिक सुडे, रमेश केंद्रे, विष्णू केंद्रे, ललिता कांबळे, शीला आचार्य, बंडू दहिफळे, रामभाऊ बडे, वीरेंद्र चव्हाण, भगवान सुडे, मदन दहिफळे, रामेश्वर डोळे, जयराम कस्तुरे, बाबूराव कस्तुरे, सचिन गोडभरले, बालाजी बडे यांच्यासह इतर अनेकांनी आभार व्यक्त केले आहेत.

पानगाव ते खरोळा पाटी रस्त्यासाठी पानगाव आणि परिसरातील नागरिकांनी पुढाकार घेऊन काम बंद पडणार नाही याची काळजी घेऊन कशा पद्धतीने लवकरात लवकर रस्त्याचे काम पूर्ण होईल यासाठी प्रयत्न करावेत असे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

# संपादकीय

## ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्याने 'इंडिया आघाडी'वर प्रश्नचिन्ह

पी. चिदंबरम, शशी थरूर आणि सलमान खुर्शीद हे काँग्रेस पक्षातील बडे नेते, त्यांची अलीकडील वक्तव्ये काँग्रेस पक्षाबरोबर इंडिया आघाडीलाही हादरे देणारी आहेत आणि काँग्रेसबरोबर इंडिया आघाडीची चिंता वाढविणारी आहेत. केंद्र सरकारने भारत–पाकिस्तान संघर्षाबाबत खासदारांची प्रतिनिधी मंडळे परदेशी पाठविण्याचे ठरविले आहे. या प्रतिनिधी मंडळात शशी थरूर यांचा प्रामुख्याने समावेश आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय भुवया उंचावणारा आहे. त्याचे काही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. 'घर का भेदी, लंका ढाये' अशी एक म्हण हिंदीत रूढ आहे. घरातील एखाद्या मातब्बराने शत्रू पक्षाशी हातमिळवणी केली की, मग त्या घराच्या दुर्दशेला पारावर राहत नाही. पक्षातील असे निखारे केव्हा आग लावतील, हे कळायचेसुद्धा नाही. एकेकाळचा बलाढ्य काँग्रेस पक्ष दुर्बल झाला असतानाच पक्षाला घरभेदींनी ग्रासले आहे आणि त्यांच्या उद्योगानी काँग्रेस ज्या इंडिया आघाडी या विरोधी आघाडीतील प्रमुख पक्ष आहे, त्या आघाडीलाही हादरे बसत आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम, सलमान खुर्शीद यांनी अलीकडेच जी वक्तव्ये केली, ती काँग्रेस विरोधकाने करावीत अशा थाटात केली आहेत. त्यांच्या वक्तव्यांनी पक्ष संघटनेच्या भावी वाटचालीबद्दल आणि इंडिया आघाडीच्या भवितव्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहेत. सलमान खुर्शीद आणि युवक काँग्रेसचे एक नेते मृत्युंजय सिंह यादव यांनी एक पुस्तक लिहिलेले आहे. 'कंटेस्टिंग डेमॉक्रेटिक डेफिसीट' हे त्या पुस्तकाचे नाव. या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी पी. चिदंबरम यांनी इंडिया आघाडी कमजोर आणि कमकुवत होत असल्याचे स्पष्टपणे सांगून टाकले. इंडिया आघाडीच्या ऐक्याला तडे जात असल्याचेही चिदंबरम यांचे म्हणणे आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या एखाद्या विरोधकाने अशी वक्तव्ये करणे शोभून दिसले असते; पण अशी अवसानघातकी वक्तव्ये चिदंबरम यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांना शोभणारी नाहीत. याविषयी दुमत व्हायचे कारण नाही. आता आत्मपरीक्षणासाठी आपण असे विधान केल्याची मखलाशी चिदंबरम करू शकतात. तथापि, 'बूँद से गयी, सो हौद से आती नही' हे खरेच आहे. सलमान खुर्शीद माजी परराष्ट्रमंत्री आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते. त्यांनीही चिदंबरम यांच्या सुरात सूर मिसळला. त्यांनीही इंडिया आघाडीविषयी शंका व्यक्त करीत टीकाटिपणी केली. आधी पूर्व प्राथमिक मुद्द्यांवर सहमती घडवून मग अधिक महत्त्वाच्या मुद्द्यांचा विचार व्हावा, असा शहाजोग सल्ला देत सलमान खुर्शीद यांनी एकप्रकारे आघाडीच्या कामकाजावर प्रश्नचिन्हच उपस्थित केले. या पुस्तकाचे सहलेखक आणि युवक काँग्रेसचे नेते मृत्युंजय सिंह यादव यांनीही मग या दोघांची री ओढली तर आश्चर्य नाही. चिदंबरम यांची भाजपवर स्तुतिसुमने इंडिया आघाडीचे वर्म काढतानाच चिदंबरम यांनी भाजपवर स्तुतिसुमने उधळली. मतदान बूथपर्यंत भाजपची ताकद आहे. लोकशाही राजवटीत जेवढी शक्तिशाली संघटना असायला हवी तेवढी ती आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजपची प्रशंसा केली. एवढेच नव्हे, तर मतदानात थोडीफार गडबड होऊ शकते; पण भारतासारख्या विशाल देशात ते शक्य नाही, असा निर्वाळाही त्यांनी दिला. भाजपला एकप्रकारे हे प्रशस्तीपत्रच दिले. एका विरोधी नेत्याचे हे प्रशस्तीपत्र आहे की, भाजपच्या नेत्याचे उद्गार आहेत, अशी शंका यावी, असा हा मामला आहे. याही आधी काँग्रेसचे आणखी एक नेते शशी थरूर यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारची प्रशंसा केली होती. 'ऑपरेशन सिंदूर' हा पाकिस्तान आणि जगाला जबरदस्त संदेश आहे, या शब्दातील थरूर यांनी केलेल्या स्तुतीवर काँग्रेसने तीव्र नापसंती व्यक्त केली आणि काँग्रेस कार्यकारिणीतही त्यावर चर्चा झाली. मग, आपले हे विधान हे आपले स्वतःचे मत आहे, पक्षाचे नव्हे, असा खुलासा थरूर यांना करावा लागला. अर्थात, तो मानभावीपणा झाला.धोक्याचा कंदील पक्षाने दिलेली मंत्रिपदे आणि अन्य पदे दीर्घकाळ उपभोगलेले काँग्रेसचे असे ज्येष्ठ नेते पक्षाच्या धोरणाच्या विरोधात जाहीर विधाने करीत आहेत आणि सत्तारूढ भाजपची भलावण करीत आहेत. पक्षासाठी हा धोक्याचा कंदील आहे. काँग्रेस पक्षातील हे घरभेदी म्हटले पाहिजेत आणि पक्ष नेतृत्वाने त्याची वेळीच गंभीर दखल घेतली नाही, तर कुंपणावर बसलेल्या अनेकांना कंठ फुटल्याशिवाय राहणार नाही. कुंपणावरची नीती काँग्रेस पक्षातून सध्या आऊटगोईंग जोरात सुरू आहे. त्यात खंड पडलेला नाही. सत्तेवाचून काँग्रेस नेता राहू शकत नाही, असेही म्हटले जाते. भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांना सत्तेची पदे मिळाल्याची भरपूर उदाहरणे आहेत. आता पक्षात काही चैतन्य राहिलेले नाही, अशीही काहींची धारणा होत चालली आहे. चिदंबरम, खुर्शीद, थरूर आदींच्या वक्तव्यातून त्यांचीही अशीच भावना असेल काय, असेही तर्क व्यक्त होत आहेत. त्यात काही चुकीचे म्हणता येणार नाही. भाजपची आक्रमक चाल काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांकडूनच इंडिया आघाडीवर विसंवादी सूर उमटत असताना आणि भाजपची प्रशस्ती होत असताना भारतीय जनता पक्षाने धूर्तपणाने आक्रमक चाल रचली आहे. भारत–पाकिस्तान संघर्षाबाबत परदेशी पाठवायच्या खासदारांच्या प्रतिनिधी मंडळात काँग्रेसचे शशी थरूर आणि खा. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांची मोठ्या चतुराईने निवड करण्यात आली आहे. आता या निवडीमागे भाजपचे काय धोरण असेल, हे सहजच समजण्यासारखे आहे. त्यावर वेगळ्या भाष्याची गरज नाही. बिहार निवडणुकीवर परिणामाची शक्यता काँग्रेस पक्षात कोणाचा पाय कोणाच्या पायपोसात नाही, अशीच स्थिती राहिली, तर त्याचे परिणाम गंभीर होऊ शकतात. आधीच पक्ष विकलांग झालेला आहे. तो आणखी दुबळा होईल. बिहार विधानसभेची निवडणूक अवघ्या पाच–सहा महिन्यांवर आहे. भाजपने त्याची जय्यत तयारी चालवली आहे, तर काँग्रेस पक्षाने अजून नारळ वाढविण्याचीही तयारी केलेली नाही. इंडिया आघाडी ही निवडणूक लढवणार, त्याची काही पूर्व तयारी दिसत नाही आणि अशीच परिस्थिती राहिली, तर घटक पक्षांसमवेत जागा वाटप करताना काँग्रेसला बॅकफूटवर जावे लागेल. दुर्दैवाने बिहारमध्ये काँग्रेस पक्षाला विपरीत परिस्थितीला सामोरे जावे लागले, तर ती उंटाच्या पाटीवरची शेवटची काडी ठरेल.

# अणुयुद्ध झालेच, तर अन्नधान्य वाचवता येईल? कसे?

भारत आणि पाकिस्तान या दोन देशांतील वैर, दहशतवाद आणि काश्मीरसारख्या मुद्द्यांमुळे सशस्त्र संघर्षाचा धोका अनेकदा उद्भवतो आणि काहीवेळा दोन्ही देशांची सैन्य प्रत्यक्ष परस्परांसमोर उभी ठाकतात. भारत– पाकिस्तान असो वा जगातील अन्य देश– युद्धसदृश स्थिती उद्भवली की अण्वस्त्रांनी सज्ज असलेले देश शत्रूराष्ट्राला अण्वस्त्रांच्या वापराची धमकी देऊ लागतात. अणुयुद्धाची शक्यता जरी दूरची असली तरी अन्नसुरक्षेवरही अशा संहाराचा परिणाम होतो, हे जाणूनच संयुक्त राष्ट्रांनीही काही उपाय सर्वच देशांसाठी सुचवले आहेत, त्याचे सविस्तर विश्लेषण..

भारत–पाक संबंधांचा ऐतिहासिक संदर्भ भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव १९४७ च्या फाळणीनंतर काश्मीरच्या मुद्द्यावरून सुरू झाला. दोन्ही देशांनी १९४७–४८, १९६५, १९७१ आणि १९९९ मध्ये युद्धे लढली आहेत. १९९८ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांनी यशस्वी अणुचाचण्या घेतल्या, ज्यामुळे दक्षिण आशियातील शस्त्रस्पर्धा तीव्र झाली. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट च्या २०२४ च्या अहवालानुसार, भारताकडे १७२ आणि पाकिस्तानकडे १७० अण्वस्त्रे आहेत. या अणुशक्तीचा प्रयोग झाल्यास कोणताही संघर्ष अत्यंत विनाशकारी ठरू शकतो, विशेषतः अन्न सुरक्षा आणि पर्यावरणीय स्थैर्याच्या दृष्टिकोनातून. आण्विक युद्धामुळे केवळ मानवी जीवितहानीच होणार नाही, तर शेती, पायाभूत सुविधा आणि अर्थव्यवस्थेचेही प्रचंड नुकसान होईल. भारत आणि पाकिस्तान हे शेतीप्रधान देश असल्याने, युद्धाचा अन्न उत्पादन आणि पुरवठा साखळीवर थेट परिणाम होईल, ज्यामुळे अन्न टंचाई आणि उपासमारीचा धोका वाढेल.



आण्विक युद्ध आणि अन्न सुरक्षेवरील परिणाम फुड अँड ग्रिकल्चर ऑर्गनायझेशन ऑफ युनायटेड स्टेट्सच्या मते, 'अन्न सुरक्षा म्हणजे सर्वांना प्रत्येक वेळी पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न उपलब्ध असणे, ज्यामुळे त्यांना सक्रिय आणि निरोगी जीवन जगता येईल.' आण्विक युद्धामुळे अन्न सुरक्षेचे चार प्रमुख घटक धोक्यात येतात– उपलब्धता, पुरवठा, शुद्धता आणि स्थिरता.

(१) अन्न–धान्याची उपलब्धता– आण्विक स्फोटांमुळे शेतीयोग्य जमीन, पाण्याचे स्रोत आणि पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. रेडिएशनमुळे माती आणि पिके दूषित होतात, ज्यामुळे अन्न उत्पादनात प्रचंड घट होते. १९८० च्या दशकात शीतयुद्धादरम्यान केलेल्या संशोधनात असे दिसून आले की मर्यादित आण्विक युद्धामुळे 'परमाणु हिवाळा' निर्माण होऊ शकतो. ज्यामुळे सूर्यप्रकाश कमी होतो, तापमान घटते आणि शेतीच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता वाढते. एका अभ्यासानुसार, भारत आणि पाकिस्तान यांच्यात मर्यादित आण्विक युद्ध झाल्यास २०–५० टक्के पिकांचे नुकसान होऊ शकते. भारतातील पंजाब, हरियाणा आणि पाकिस्तानातील सिंध आणि पंजाब हे शेतीसाठीचे महत्त्वाचे भाग आहेत. अणुयुद्ध झाल्यास या भागातील उत्पादन पूर्णपणे बंद होऊन जमिनी नापीक होऊ शकतात.

(२) अन्न पुरवठा – युद्धामुळे वाहतूक आणि वितरण व्यवस्था कोलमडते, ज्यामुळे अन्न बाजारापर्यंत पोहोचणे कठीण होते. भारत आणि पाकिस्तानमधील सीमावर्ती भाग, जसे की पंजाब आणि राजस्थान, हे अन्नधान्य उत्पादनासाठी महत्त्वाचे आहेत. युद्ध झाल्यास या भागातील अन्न पुरवठा साखळी खंडित होणार हे नक्कीच, ज्यामुळे अन्नाच्या किमतीत प्रचंड वाढ होईल. च्या अहवालानुसार, युद्धग्रस्त भागात अन्नाच्या किमती ३० ते ५० टक्के वाढू शकतात. ज्यामुळे गरीब आणि असुरक्षित लोकसंख्येला अन्न मिळणे कठीण होते, विशेषतः भारतातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत लाभ मिळणाऱ्या ८० कोटी लोकांना याचा मोठा फटका बसू शकतो.

(३) अन्न–धान्याची शुद्धता– किरणोत्सारामुळे अन्न आणि पाणी दूषित होते आणि खाण्यास अयोग्य ठरते. यामुळे कुपोषण, रोग आणि दीर्घकालीन आरोग्य समस्यांचा धोका वाढतो. अन्न आणि कृषी संघटनेच्याच्या मते, दूषित अन्नामुळे कर्करोग, जन्मजात दोष आणि इतर आजारांचे प्रमाण वाढते. युद्धानंतर स्वच्छ पाणी आणि अन्नाची कमतरता यामुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यताही वाढते.

(४) स्थिरता– आण्विक युद्धामुळे अर्थव्यवस्था, सामाजिक संरचना आणि पर्यावरण यांचे दीर्घकालीन नुकसान होते. भारत आणि पाकिस्तानात अशी स्थिती उद्भवल्यास अन्नसुरक्षेसारख्या योजनांवर त्याचा गंभीर दुष्परिणाम होऊ शकतो. युद्धानंतर देशाच्या पुनर्बांधणीसाठी प्रचंड खर्च येतो, ज्यामुळे अन्न सुरक्षेसाठी निधीची कमतरता निर्माण होते. यामुळे अन्न टंचाई आणि सामाजिक अस्थिरता वाढण्याचा धोका असतो.

अन्न आणि कृषी संघटना व संयुक्त राष्ट्रांची भूमिका जागतिक अन्न आणि कृषी संघटना ही संयुक्त राष्ट्रांची विशेष एजन्सी आहे, जी भूक आणि अन्न सुरक्षेच्या समस्यांवर काम करते. युद्धग्रस्त भागांत अन्न आणि कृषी संघटना आपत्कालीन अन्न पुरवठा, शेती पुनर्वसन आणि दीर्घकालीन विकास कार्यक्रम राबवते. अणुयुद्ध झाल्यास दूषित जमिनीचे पुनर्वसन, किरणोत्सार–प्रतिरोधक पिकांचा विकास आणि अन्न पुरवठा साखळी पुनर्स्थापित करण्यासाठी ही संघटना तांत्रिक सहाय्य देऊ शकते. अन्न आणि कृषी संघटनेच्या 'अन्न सुरक्षा क्लस्टर' अंतर्गत युद्धग्रस्त भागात अन्न वितरण आणि पुनर्वसनासाठी विशेष योजना राबवल्या जाऊ शकतात.

संयुक्त राष्ट्रांच्या संदर्भात, युद्धानंतर शांतता प्रस्थापित करणे आणि पुनर्बांधणी ही त्याची प्राथमिक जबाबदारी असते. १९६५ आणि १९७१ च्या भारत–पाक युद्धांनंतर संयुक्त राष्ट्रांनी युद्धविराम लागू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. आण्विक युद्धाच्या बाबतीत, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, युनिसेफ आणि जागतिक अन्नपरिषद युद्धग्रस्तांना अन्न, निवारा आणि वैद्यकीय सहाय्य प्रदान करते. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता राखण्याच्या प्रयत्नांमुळे युद्धानंतर सामाजिक स्थैर्य पुनर्स्थापित होण्यास मदत होईल.

निःशस्त्रीकरण करारांचे महत्त्व– निःशस्त्रीकरण करार आण्विक युद्धाचा धोका कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. भारत आणि पाकिस्तान यांनी अण्विक प्रसारबंदी करार आणि सर्वसमावेशक अण्विक चाचणी बंदी करार यावर स्वाक्षरी केलेली नाही, ज्यामुळे अण्वस्त्र शस्त्रस्पर्धा नियंत्रित करणे कठीण आहे. तथापि, १९८८ मध्ये दोन्ही देशांनी परमाणु सुविधांवर हल्ला न करण्याचा करार केला आहे, जो आण्विक युद्धाचा धोका काही प्रमाणात कमी करतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर, संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली निःशस्त्रीकरणाला चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. २०१७चा अण्विक शस्त्रबंदी करार हा परमाणु शस्त्रे पूर्णपणे नष्ट करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. भारत आणि पाकिस्तान यांनी या कराराला पाठिंबा दिलेला नसला, तरी भविष्यात निःशस्त्रीकरणाला चालना मिळू शकते. यासाठी दोन्ही देशांनी परमाणु शस्त्रांचा साठा कमी करणे आणि पारदर्शकता वाढवणे आवश्यक आहे.

अन्नाच्या किमतींवर परिणाम– आण्विक युद्ध झाल्यास अन्न उत्पादन आणि पुरवठा साखळीवर होणाऱ्या परिणामांमुळे अन्नाच्या किमतीत प्रचंड वाढ होईल. भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही शेतीप्रधान देश असून, युद्धामुळे त्यांच्यातील व्यापार बंद होईल. च्या मते, युद्धग्रस्त भागात अन्नाच्या किमती ३०–५० टक्के वाढू शकतात. उदाहरणार्थ, पाकिस्तानातून येणारे फळ, कापूस आणि काळे मीठ आणि भारतातून जाणारी औषधे, साखर आणि मसाले यांच्या किमती वाढतील. जागतिक बाजारपेठेतही अन्नाच्या किमतींवर परिणाम होईल, कारण भारत हा तांदूळ, गहू आणि साखरेचा प्रमुख निर्यातदार आहे. युद्धामुळे जागतिक अन्न पुरवठ्यात १०–१५ टक्के घट होऊ शकते, ज्यामुळे विशेषतः आफ्रिका आणि आशियातील गरीब देशांमध्ये अन्न टंचाई निर्माण होईल. यामुळे जागतिक स्तरावर कुपोषण आणि उपासमार वाढेल. आण्विक युद्धाचा धोका आणि त्याचा अन्न सुरक्षेवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी खालील उपाय सुचवले जातात: (१) कूटनीती आणि संवाद– भारत आणि पाकिस्तान यांनी काश्मीरसह सर्व विवाद शांततापूर्ण मार्गाने सोडवण्यासाठी संवाद वाढवावा. (२) निःशस्त्रीकरणाला प्रोत्साहन– दोन्ही देशांनी आणि सारख्या करारांना पाठिंबा द्यावा आणि परमाणु शस्त्रस्पर्धा कमी करावी. (३) अन्न सुरक्षा योजना: च्या सहाय्याने, भारत आणि पाकिस्तान यांनी आपत्कालीन अन्न साठा, शेती पुनर्वसन आणि वितरण व्यवस्था मजबूत करावी. (४) जागतिक सहकार्य: आंतरराष्ट्रीय समुदायाने युद्धग्रस्त भागात तात्काळ सहाय्य आणि दीर्घकालीन पुनर्बांधणीसाठी निधी उपलब्ध करावा.

(५) शेती तंत्रज्ञान: किरणोत्सार–प्रतिरोधक पिकांचा विकास आणि शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन द्यावे. निष्कर्ष भारत–पाक आण्विक युद्ध झाल्यास तो केवळ प्रादेशिक नव्हे तर जागतिक अन्न सुरक्षेसाठी एक गंभीर धोका ठरेल. त्यामुळे अन्न उत्पादन, पुरवठा साखळी आणि किमतींवर गंभीर परिणाम होईल, ज्यामुळे लाखो लोक उपासमारी आणि कुपोषणाला बळी पडतील. आणि सारख्या संस्था युद्धानंतरच्या पुनर्बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावतात, तर निःशस्त्रीकरण करार युद्धाचा धोका कमी करू शकतात. भारत आणि पाकिस्तान यांनी शांतता, सहकार्य आणि कूटनीतीचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे, जेणेकरून अन्न सुरक्षा आणि मानवतेचे रक्षण होईल. केवळ जागतिक समुदायाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे या संकटाचा सामना करता येईल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी शांतता आणि समृद्धी सुनिश्चित होईल.

# अशिष्ट राजकारण

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर केलेल्या लष्करी कारवाईच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारची भूमिका जगाला समजावून सांगण्यासाठी भारतातील खासदारांची शिष्टमंडळे जागतिक दौरा करणार आहेत. राजनैतिक स्तरावर ही एक चांगली भूमिका असली आणि भारताची बाजू जगाला पटवून देण्यासाठी एक चांगली रणनीती असली, तरी या निमित्ताने भारतीय राजकीय पटलावर जे राजकारण सुरू झाले आहे त्याचा विचारही करावा लागणार आहे.

या शिष्टमंडळांमध्ये नेते म्हणून ज्या नेत्यांची निवड करण्यात आली आहे किंवा शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी ज्या नेत्यांकडे देण्यात आली आहे त्यावरून आता वाद सुरू झाला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने ओळखली जाणारी लष्करी कारवाईची मोहीम सध्या थांबली असली तरी त्यानिमित्ताने तयार झालेला टेम्पो कमी करण्याची भाजप सरकारची तयारी नाही हे गेल्या काही दिवसांमध्ये समोर आलेच आहे.

भाजपाच्या पातळीवर देशात सर्वत्र काढण्यात आलेली तिरंगा रॅली असो किंवा इतर काही उपक्रम असो या निमित्ताने सरकारची प्रतिमा अधिक उजळ करण्याचे काम जाणीवपूर्वक करण्यात येत आहे. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून आता खासदारांचे शिष्टमंडळ परदेशी दौर्यावर पाठवण्यात येणार आहे. पण या शिष्टमंडळाची रचना ठरवतानासुद्धा भाजपाने थोड्याफार प्रमाणात राजकारण केले आहे हे नाकारून चालणार नाही.

केंद्रातील भाजप सरकारबाबत अधूनमधून सहानुभूती दाखवणारे काँग्रेसचे खासदार शशी थरूर, शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे, बिहारमधील संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा, द्रमुकच्या नेत्या कनिमोळी ही नावे जर पाहिली तर ही नावे निवडतानासुद्धा भाजपाने काही विशिष्ट हेतू समोर ठेवला आहे हे सहज लक्षात येते. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये एक सनदी अधिकारी म्हणून दीर्घकाळ वावरलेले शशी थरूर सध्या केरळमधील काँग्रेसचे खासदार असले तरी अधूनमधून ते नरेंद्र मोदी सरकारच्या निर्णयांची तारीफ करत असतात आणि त्याबद्दल काँग्रेस पक्षाने त्यांना अनेक वेळा ताकीदही दिली आहे. शशी थरूर यांच्याकडे एका शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देण्यात आल्यामुळे काँग्रेस पक्ष नाराज झाला आहे आणि त्यांनी सरकारकडे नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेसने शिष्टमंडळसाठी ज्या नेत्यांची नावे सुचवली होती ती नावे भाजपा सरकारने स्वीकारली नाहीत आणि शशी थरूर यांचेच नाव पुढे केले असा दावा आता काँग्रेसतर्फे केला जात आहे. पण शशी थरूर हे काँग्रेसचेच नेते आहेत हे लक्षात घेतले तर काँग्रेस पक्षाची ही नाराजी काही प्रमाणात पोकळ ठरू शकते. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आणि संवादाचा अनुभव असणार्या शशी थरूर यांच्याकडे जर या महत्त्वाच्या कामाची जबाबदारी दिली असेल तर त्यात चुकीचे काही नाही.

काँग्रेस पक्षाला विश्वासात न घेता किंवा त्यांनी सुचवलेल्या नावांना महत्त्व न देता भाजपा सरकारने शशी थरूर यांच्या नावाला पसंती दिली ही गोष्ट मात्र निश्चितच आक्षेपार्ह असू शकते. अशाच प्रकारची भूमिका पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनीसुद्धा घेतली आहे. पक्षप्रमुखाला न विचारता अशा कामासाठी एखाद्या नेत्याची निवड करणे योग्य नाही अशी नाराजी ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केली आहे. काँग्रेस असो किंवा ममता बॅनर्जी असो यांनी व्यक्त केलेली नाराजी

# विद्वेषक वक्तव्य करणाऱ्यां निर्लज्ज नेत्यांचे काय करावे समजत नाही!हे मायबाप सरकार यांचे काहीतरी कराच!

पहलगाम आतंकवादी हल्लानंतर भारताने आतंकवाद विरोधी व आतंकवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला भारतीय सेनेने चांगलाच धडा शिकवुन चपराक दिली व पाकिस्तानला पाणी–पाणी करून सोडले आणि जगातील अनेक देशांनी ऑपरेशन सिन्दुरची प्रशंसा सुध्दा केली व भारतासोबत आम्ही उभे आहोत अशी ग्वाही सुध्दा दिली.यामुळे अमेरिका,चीन, तुर्की सुध्दा हादरला.परंतु देशातील काही बेवकुफ, निर्लज्ज व बेजबाबदार राजकीय पुढारी असे बोलतात की जणुकाय तेच सिमेवर लढाईला गेले की काय असे वाटते!ते काय खातात कल्पना नाही.कारण ते समाजाबद्दल वाट्टेल बोलुन विष ओकत असतात,भेदभाव निर्माण करतात, देशाच्या सुरक्षेव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करतात, ज्यांच्यापुढे देशाची १४० कोटी जनता नतमस्तक आहे आणि होते अशा कर्नल सोफिया कुरैशी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि संपूर्ण सैन्य शक्तीवर जर कोणी प्रश्नचिन्ह उपस्थित करीत असेल तर तो कोणीही असो त्याला देशद्रोहीच म्हणावे लागेल आणि देशद्रोहाची शिक्षा व्हायलाच हवी. घृणास्पद आणि बेजबाबदारपणाचे वक्तव्य करणारे लोक अन्न खातात की आणखी काय खातात कल्पना नाही!सर्वप्रथम कर्नर सोफिया कुरैशी यांच्या बद्दल मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शाह यांनी विष ओकले व अप्रत्यक्षरीत्या धर्माच्या नावावर बेताल वक्तव्य करून सेनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले,यानंतर सपा प्रमुख रामगोपाल यादव यांनी वादग्रस्त टिप्पणी करतांना व्योमिका सिंह यांची जात रामगोपाल यांनी नमूद केली आणि म्हणाले विंग कमांडर व्योमिका सिंह ही हरियाणाची जाटव आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये कारवाई करणारे एअर मार्शल अवधेश कुमार भारती यादव हे आहेत.एक मुस्लिम, दुसरा जाटव आणि तिसरा यादव हे युध्द फक्त पीडीए (मागासवर्गीय,दलित, अल्पसंख्याक) यांनीच लढले.अशाप्रकारे घृणास्पद वक्तव्य करून रामगोपाल यादव यांनी जाती–जातीमध्ये दरार निर्माण करण्याचे काम करून जातीयवादाचे जहर पसरविण्याचे काम केले.जेव्हा–जेव्हा भारतीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा–तेव्हा संपूर्ण भारतवर्ष एकत्र येतो प्रश्न रहाला सुरक्षा व्यवस्थेचा सुरक्षा व्यवस्थेमध्ये किंवा सेनेमध्ये जात–पात, धर्म याला कोणत्याही प्रकारचा थारा नसतो.सैनिकांचा व सुरक्षा व्यवस्थेचा एक उद्देश असतो देशाची व देशवासीयांची रक्षा करने.परंतु देशात काही नालायक राजकीय पुढारी आताही दिसून येतात आणि बेजबाबदार वक्तव्य करून निघून जातात व नंतर सावसावर करण्यासाठी माफी मांगतात इतके बेशरम असतात हे लोक. जीभेला हाड नसलेले उच्च पदस्थ मध्यप्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी भारतीय सैन्यदलांबाबद वादग्रस्त वक्तव्य करून देशाच्या एकतेला धक्का देण्याचे काम केले.ते म्हणतात देश सैन्यदल आणि सैनिक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चरणांशी नतमस्तक झाले आहेतअसे वक्तव्य जगदीश देवडा यांनी करून त्यांची स्वतःची काय लायकी आहे हे दाखवून दिले.जगदीश देवडा यांना कदाचित देशाबद्दल व देशाच्या प्रधानमंत्र्यांबद्दल काहीच कल्पना नसावी ऑपरेशन सिन्दुरने जी बहाद्दूरी दाखविली आणि पाकिस्तानला जमीनीवर लोळवले त्या संपूर्ण सैन्य शक्तीला प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदी सॅल्युट मारतात व नतमस्तक होतात आणि सैन्यामध्ये नव्याने ऊर्जा निर्माण करण्यासाठी सिमावर्ती भागात दौरा करतात म्हणजे आज संपूर्ण देशाची १४० कोटी जनता व स्वतः प्रधानमंत्री भारतीय सैन्य शक्तीपुढे नतमस्तक आहेत आणि जगदीश देवडा बेजबाबदारपने वक्तव्य करून देशवासीयांमध्ये भ्रम निर्माण करण्याचे काम करतात हा अत्यंत गंभीर विषय आहे.हीबाब सत्य आहे की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे देशाचे खंबीर नेतृत्व आहे यात दुमत नाही.कारण आज भारत तिसरी महाशक्ती होण्याच्या वाटेवर आहे आणि भारत किती शक्तीशाली देश आहे ही बाब ऑपरेशन सिन्दुर मध्ये संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पाहीली. हे संपूर्ण दृष्य डोळ्यासमोर असुनही बेजबाबदार व बेताल वक्तव्य करणारे विजय शाह, रामगोपाल यादव व जगदीश देवडा यांची वक्तव्य वेगवेगळे जरी असले तरी ते सैन्य विरोधी,देश विरोधी व देशाच्या १४० कोटी जनतेला ठेच पोहचविणारे आहेत.यांच्यावर सर्वच स्तरातून टिका सुध्दा झाल्यात तरीही आपापल्या पदावर विराजमान आहेत यावरून स्पष्ट होते हे लोक किती बेशरम असतात. सरकारने यांच्यावर कठोर कारवाई केली नाही तर हे असेच ओकत रहातील.त्यामुळे अशा राजकीय पुढाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखविने सरकारचे व न्यायपालिकेचे कर्तव्य आहे. विद्वेषक वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना हात जोडून विनंती करतो की,देश हितासाठी थोडीशी तरी जनाची नाही तर मनाची लाज ठेवा! राजकारणात तुम्ही काहीही करा! परंतु देशाच्या सैन्य शक्तीला व सुरक्षेला कुठे ठेच पोहचणार नाही याची काळजी घ्या.यातच खरे देश हित आहे.जय हिंद!

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# धम्म संस्कारामुळे भारताला बुद्धकालीन वैभव प्राप्त होईल. -डॉ. भीमराव आंबेडकर









लातूर :- दि ८ मे २०२५ ते १८ मे २०२५ यादरम्यान बुद्ध गार्डन लातूर येथे भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूर पश्चिम यांच्या वतीने दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, त्या समारोप प्रसंगी डॉ. भीमराव आंबेडकर बोलत होते. पुढे बोलताना ते असे म्हणाले की, तथागत बुद्ध व सम्राट अशोक यांच्या काळातील भारत निर्माण करावयाचा असेल तर धम्म संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या २४ प्रकारच्या शिबिरामध्ये उपासक उपासिकांनी व त्यांच्या पाल्यांनी सहभागी झाले पाहिजे. त्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही प्रत्येक गावात जाऊन अशा शिबिरांचे आयोजन केले पाहिजे असेही त्यांनी याप्रसंगी त्यांनी आवाहन केले. पुढे बोलताना ते म्हणाले आंबेडकरी चळवळीचा अकोला पॅटर्न निर्माण झाला आहे त्याच धर्तीवर बौद्ध धम्म चळवळीचा लातूर पॅटर्न निर्माण व्हावा अशी अपेक्षा त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. याप्रसंगी संघाचे संघनायक भंतेजी महाविरो थेरो काळेगाव, व भन्ते पी. धम्मानंद यांच्याबरोबरच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून धम्म संस्थेचे ट्रस्टी तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष व समता सैनिक दलाचे स्टाफ ऑफिसर आदरणीय ॲड एस के भंडारे महाराष्ट्र राज्याध्यक्ष यु. जी. बोराडे राज्यसंघटक प्रा बापूसाहेब गायकवाड, डी एस नरसिंगे दैवशाला गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्षा आशाताई चिकटे तर प्रमुख पाहुणे म्हणून बीएसएनएलचे महाप्रबंधक अनिल बनसोडे, सार्वजनिक बांधकाम विभाग उपाभियंता संजय सावंत, गोदावरी हॉस्पिटलचे संचालक डॉ. सदानंद कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समितीचे अध्यक्ष सुशीलभाऊ चिकटे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, प्रदीप आचार्य, केंद्रीय शिक्षक नाना बागुल गुरुजी, हेही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे व डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे यांनी केले. हे दहा दिवसीय श्रामणेर शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महिला जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे,महिला जिल्हा सरचिटणीस वंदनाताई कांबळे, जिल्हा कोषाध्यक्ष अर्जुन कांबळे, महिला जिल्हा कोषाध्यक्ष मायाताई कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष संस्कार विभाग गौतम बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष संरक्षण विभाग मेजर जनरल राजाराम साबळे, महिला जिल्हा उपाध्यक्ष संरक्षण विभाग मंगलताई सुरवशे, जिल्हा उपाध्यक्ष प्रचार पर्यटन विभाग राजेंद्र क्षीरसागर, डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, कायदेविषयक सल्लागार मंडळाच्या उपप्रमुख ज्ञानेश्वरी ताई बटवाड, जिल्हा सचिव प्रेमनाथ कांबळे, जिल्हा सचिव दत्तात्रय भोसले, हिशोब तपासणीस राजाभाऊ उबाळे, कार्यालयीन सचिव रवींद्र राजेगावकर, जिल्हा सचिव प्रचार व पर्यटन आनंद डोणेराव, जिल्हा सचिव लक्ष्मण कांबळे, जिल्हा संघटक प्रा. भाऊराव कांबळे, जिल्हा संघटक रतन आचार्य, जिल्हा संघटक संतोष कांबळे केळगावकर, औसा सरचिटणीस दिलीप बौद्धवीर, पानगाव चैत्य स्मारकाचे अध्यक्ष व्ही. के. आचार्य, तालुकाध्यक्ष अशोक कांबळे, तालुका सरचिटणीस डॉ. भाऊसाहेब आदमाने, तालुका कोषाध्यक्ष विद्याताई ससाने, तालुका कार्यालयीन सचिव राजेंद्र हजारे, शहराध्यक्ष बिभीषण माने, शहर सरचिटणीस विनोद टेंकाळे, कोषाध्यक्ष महादेव गायकवाड, संघटक प्रकाश अडसुळे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष सुनील कांबळे, जिल्हा सचिव प्रा. प्रशांत उघाडे यांनी परिश्रम घेतले.सदरील कार्यक्रमास बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते

# खा.सोनवणेंनी मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा; पीक कर्जाची मर्यादा वाढविण्याची बैठकीत मागणी

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.सोनवणे बनले शेतकऱ्यांचा आवाज

खा.सोनवणेंनी शब्द टाकला अन् दादांकडून होकार
अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे रात्रंदिवस काम सुरू आहे परंतु याचसोबत धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेची मागणी देखील पुढे आलेली आहे. आपण केंद्रात यासाठी आवश्यक पाठपुरावा करत आहोत, असे सांगत खा.सोनवणे यांनी धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी राज्यशासनाने अर्धा हिस्सा देण्यात यावा, अशी महत्वपुर्ण मागणीही उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी देखील ही मागणी मान्य केली.

झेडपीच्या अतिरिक्त कारभाराच्या विषयावर चर्चा
जिल्हा परिषद प्रशासनात काही कर्मचारी प्रशासकिय बदल्यानंतरही अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी पदभार घेतात. मागील दहा वर्षांपासून जिल्हा परिषदेत जवळपास ७७ कर्मचारी असेच काम आहेत. यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडे असलेला पदभार काढून त्यांना मुळे ठिकाणी पाठवावे, अशी भुमिकाही खा.बजरंग सोनवणे यांनी मांडली. यावेळी या विषयावर अधिकाऱ्यांनी चर्चा करून कार्यवाही करू, असे सांगितले.

बोगस पिकविम्यावरही उठवला आवाज
बीड जिल्ह्यात मागील काळात बोगस पीक विमा भरून परळी भागातील लोकांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

बीड/प्रतिनिधी जिल्ह्यातील बहूतेक भागात शेती खरडा-बर्डाची आहे. यात कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकट शेतकऱ्यांच्या मागे उभाच असतात. अशावेळी शेतकऱ्यांना पीककर्ज आवश्यक असते. आतापर्यंत शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत पीककर्ज दिले जात असून त्याची मर्यादा वाढवून ता ५ लाखापर्यंत करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली. जिल्हा नियोजन समितीची बैठक दि.१९ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी पालकमंत्री ना. अजित पवार, मंत्री ना.पंकजा मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, आ.धनंजय मुंडे, आ.संदीप



क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडीत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या विषयाला हात घालत बीडसाठी रेल्वे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अहिल्यानगर ते परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. परंतु मध्यल्या काळात रेल्वेचे रूळ अंथरण्याच्या कामासोबत विद्यूत जोडणीचे काम त्याच वेगाने होणे आवश्यक होते. विद्युत जोडणीस होत असलेल्या विलंबामुळे रेल्वेची हायस्पीड चाचणी होऊनही रेल्वे बीडपर्यंत येऊ शकलेली नाही. दरम्यान, रेल्वे विभागातील ओव्हर ब्रिज, अंडर ब्रिज तयार करीत असताना त्यात अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पालकमंत्री अजित पवार यांनीही यात लक्ष घातल्यास अनेक अडचणी सुटून रेल्वे कामाला हायस्पीड गती मिळेल, येणाऱ्या काळात बीडला रेल्वे येईल आणि जिल्हयाच्या विकासाला चालना मिळेल, असेही खा.सोनवणे म्हणाले.

## विजय शाहांना अटकेपासून तूर्त दिलासा, पण डखढ करणार चौकशी ; कर्नल सोफिया प्रकरणी शाह यांच्या अडचणीत वाढ

कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावरील वादग्रस्त विधानावरून सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशचे कॅबिनेट मंत्री विजय शाह यांना पुन्हा एकदा फटकारले आहे. तसेच या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यास न्यायालयाने मान्यता दिली आहे.त्यामुळे आता विजय शाह यांच्या अडचणीत आता वाढ झाल्याचे दिसून येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज सुनावणी दरम्यान विजय शहा यांची माफी नाकारली आहे. पण त्यांच्या तात्काळ अटकेलाही स्थगिती दिली आहे. यासोबतच या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या एसआयटीमध्ये तीन आयपीएस अधिकारी असतील, ज्यात एका महिला अधिकाऱ्याचा समावेश असेल असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. विशेष चौकशी समितीची स्थापना करण्याचे आदेश न्यायालयाने मध्य प्रदेशाबाहेरील तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची विशेष चौकशी समिती (एसआयटी) स्थापन करण्यास सांगितले आहे. न्यायालयाने म्हटले की आम्ही या प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवू. या संदर्भात मध्य प्रदेश सरकारला नोटीस बजावण्यात आली आहे. न्यायालयाने म्हटले की, आम्ही एसआयटीला या तपासाचे निकाल राज्य अहवालाद्वारे सादर करण्याचे निर्देश देतो. एसआयटी २८ मे रोजी या प्रकरणाचा पहिला अहवाल सादर करेल. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने विचारले की तुम्ही माफी मागितली आहे का? न्यायालयाने विजय शाह यांना त्यांनी काय सांगितले आणि कशासाठी माफी मागितली याचा व्हिडिओ दाखवण्यास सांगितले. तुम्ही माफी कशी मागितली हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. काही लोक हातवारे करून माफी मागतात. काहींनी मगरीचे अश्रू ढाळले. आम्हाला जाणून घ्यायचे आहे. न्यायालयाने विजय शाह यांचे वकील मनिंदर सिंग यांना सांगितले की, आम्हाला तुमच्याकडून अशी माफी नको आहे. तुम्ही आधी चूक करता आणि नंतर न्यायालयात जाता. तुम्ही एक जबाबदार नेते आहात. तुम्ही विचारपूर्वक बोलावे पण तुम्ही खूप वाईट भाषा वापरली आहे. असे म्हणत न्यायालयाने त्यांना फटकारले आहे. आम्ही तुमचा माफीचा अर्ज फेटाळतो यावर विजय शाह यांचे वकील मनिंदर सिंह म्हणाले की, त्यांनी माफी मागितली आहे. त्यासाठी त्यांनी माफी मागणारा व्हिडिओही प्रसिद्ध केला आहे. यावर न्यायालयाने म्हटले की, माफी कशी मागितली जाते यावर ते अवलंबून आहे. तुमची भाषा आणि शैली तुम्हाला लाज वाटत नाहीये असे वाटत नाही. तुम्ही म्हणत आहात की जर कोणी दुखावले असेल तर तुम्ही माफ करा. आम्ही तुमचा माफीचा अर्ज फेटाळतो.

# संजय राऊतांचे ‘नरकातील स्वर्ग’ पुस्तक वसंत मोरेंच्या देव्हाऱ्यात; म्हणाले पुस्तक माझ्यासाठी प्रेरणादायी, दररोज पारायणही करणार

ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्या ‘नरकातील स्वर्ग’ या पुस्तकाची मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. ईडीकडून अटक झाल्यानंतर तुरुंगातील दिवसांच्या अनुभवावर संजय राऊत यांनी हे पुस्तक लिहिलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. या पुस्तकांमधून राऊतांनी अनेक खुलासे केले आहेत.

महायुतीतील काही नेत्यांनी या पुस्तकावरून संजय राऊत यांच्यावर टीका देखील केली. याचदरम्यान या पुस्तकावर पुण्यातील ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते वसंत मोरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या पुस्तकाची प्रत मोरे यांनी देव्हाऱ्यात ठेवली असून या पुस्तकाचे पारायण करणार असल्याचे वसंत मोरे यांनी म्हंटले आहे. तसेच पुण्यातील इतर कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांकडून देखील या पुस्तकाचं पारायण करून घेणार असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना म्हंटले आहे. पुस्तक देव्हाऱ्यात ठेवण्यामागचे सांगितले कारण वसंत मोरे पुढे म्हणाले की, ‘या पुस्तक प्रकाशनापूर्वी माझी आणि संजय राऊत यांची भेट झाली होती. या भेटीमध्ये त्यांनी हे पुस्तक विरोधात राहून ज्यांना यशस्वी राजकारण करायचं आहे. त्यांच्यासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरणार असल्याचं म्हटलं होतं. मी महानगरपालिकेमध्ये विरोधी पक्ष नेता म्हणून देखील काम केलं आहे. त्यामुळे माझं राजकारण हे विरोधी बाकावर बसूनच यशस्वी झालं आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी लिहिलेलं नरकातील स्वर्ग हे पुस्तक मी घेऊन आलो असून ते घरातील माझ्या देव्हाऱ्यात ठेवलं आहे. राजकारण चांगले आहे परंतु ते करताना आव्हाने येत असतात. त्यामुळे चांगल्या कामाची सुरुवात करत असताना ती देवाऱ्यापासून केली पाहिजे. हे पुस्तक माझ्यासाठी विरोधी पक्षात राहून यशस्वी राजकारण करण्याच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शक ठरणार आहे, असं मोरे म्हणाले. पुढे वसंत मोरे म्हणाले, राऊत हे ज्या पद्धतीने विरोधकांनी कितीही टीका टिप्पणी केली तरी बिनधास्तपणे वावरत असतात. त्याच पद्धतीने पुण्यात देखील मी लोकांची कामे करताना कोणताही राजकीय विचार मनात न आणता बिनधास्तपणे वावरत असतो.

## दीपिका कक्करला झाला लिव्हरमध्ये टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर, लिव्हर ट्यूमर कशामुळे होतो? वाचा, तज्ज्ञांनी सांगितली लक्षणे आणि उपचार

टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर तिच्या अभिनयासाठी ओळखली जाते. सेलिब्रिटी मास्टरशेफ इंडिया या कुकिंग रिॲलिटी शोमधून तब्बल पाच वर्षांनंतर ती टेलिव्हिजनवर परतली होती. पण, अचानक ती या शोमधून बाहेर पडली आणि एकच खळबळ उडाली. काही दिवसांनी तिचा पती अभिनेता शोएब इब्राहिमने तिला लिव्हरमध्ये ट्यूमर असल्याचे सांगितले. तिच्या चाहत्यांसाठी हा खूप मोठा धक्का आहे. शोएबने ब्लॉग टायटलमध्ये लिहिलेय, दीपिकाची तब्येत ठीक नाही, तिला पोटाचा त्रास आहे, तुमच्या प्रार्थनेची तिला आवश्यकता आहे. शोएब सांगतो, जेव्हा मी चंदीगडमध्ये होतो तेव्हा दीपिकाच्या पोटात अचानक वेदना सुरू झाल्या. सुरुवातीला आम्हाला वाटले की ते ॲसिडिटीमुळे होत आहे. पण, नंतर जेव्हा वेदना कमी झाल्या नाही, तेव्हा तिने आमच्या फॅमिली डॉक्टरांशी संपर्क साधला, ज्यांनी आमच्या वडिलांवरही उपचार केले होते. त्यांनी काही अँटीबायोटिक्स दिल्या आणि तिला रक्त तपासणी करण्यास सांगितले. त्यानंतर ती ५ मे पर्यंत अँटीबायोटिक्स घेत होती आणि मी परत आलो तेव्हा ती बरी होती.

त्यानंतर तो पुढे सांगतो, बाबांच्या वाढदिवसानंतर, तिला पुन्हा एकदा वेदना जाणवू लागल्या आणि या दरम्यान तिच्या रक्त तपासणीचे रिपोर्टस आले, ज्यामध्ये तिच्या शरीरात इनफेक्शन झाल्याचे दिसले. डॉक्टरांनी आम्हाला पुन्हा भेटायला सांगितले आणि जेव्हा आम्ही त्यांना भेटलो तेव्हा त्यांनी आम्हाला सीटी स्कॅन करण्यास सांगितले. त्यात असे दिसून आले की, दीपिकाच्या लिव्हरच्या डाव्या भागामध्ये ट्यूमर आहे. हा ट्यूमर टेनिस बॉलसारखा आकाराने मोठा आहे. आमच्यासाठी हे खूप धक्कादायक होते. शोएब पुढे म्हणाला की, सध्या ट्यूमर सौम्य असल्याचे दिसून येत आहे, पण उपचार घेण्यासाठी ते आणखी काही रिपोर्ट्सची वाट पाहात आहेत. लिव्हरमध्ये टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर कशामुळे होऊ शकतो? जीआय सर्जरी आणि लिव्हर ट्रान्सप्लांटेशन पीएसआरआय हॉस्पिटल येथील वरिष्ठ सल्लागार डॉ. भूषण भोळे द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगतात, जेव्हा आपण लिव्हरचा ट्यूमर किंवा लिव्हरच्या आजाराविषयी बोलतो, तेव्हा ती समस्या सौम्य प्रकारची असू शकते किंवा अत्यंत धोकादायकसुद्धा असू शकते, म्हणजेच कर्करोगजन्यसुद्धा असू शकते.

डॉ. भोळे पुढे सांगतात, रुग्णाला ओटीपोटात वेदना, मळमळ, उलट्या, ॲसिडिटीची लक्षणे दिसतात आणि नंतर तुम्ही अल्ट्रासाऊंड आणि सीटी स्कॅनसारख्या काही तपासण्या करता, तेव्हा तुम्हाला लिव्हरमध्ये दुखापत असल्याचे आढळते, यालाच लिव्हर ट्यूमर म्हणतात. लिव्हर ट्यूमर कोणत्याही आकाराचे असू शकतात. तज्ज्ञांच्या मते, लहान लिंबूपासून टेनिस बॉलच्या आकारापेक्षा मोठे हे ट्यूमर असू शकते. जेव्हा ट्यूमर सौम्य असतो, तेव्हा तो हेमॅन्गिओमा असू शकतो.

# तरुणांमध्ये कंबर अन् नितंबदुखी वाढण्यामागे ‘हे’ आहे मोठं कारण, जिम करणाऱ्यांनी घ्या विशेष काळजी; डॉक्टरांचा सल्ला

तरुणांमध्ये फिटनेसची क्रेझ वाढताना दिसतेय. इतरांपेक्षा फिट अँड फाइन दिसण्यासाठी ते जिम आणि हेल्दी डाएट प्लॅन फॉलो करतात. याशिवाय तगडी बॉडी बनवण्यासाठी जिमबरोबर स्टिरॉइड्स आणि प्रोटीन पावडरचेही सेवन करतात. पण, याच गोष्टींवरून आता ऑर्थोपेडिकतज्ज्ञांच्या एका गटाने तरुणांच्या आरोग्याबाबत मोठी चिंता व्यक्त केली आहे. २० वर्ष वयोगटातील अनेक तरुण जिमला जाण्याबरोबर स्टिरॉइड्स आणि प्रोटीन पावडरचे अयोग्य प्रमाणात सेवन करतात, जे त्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तसेच याच गोष्टींमुळे तरुणांच्या कंबर आणि नितंबाला गंभीर नुकसान होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दिल्लीत आयोजित ‘दिल्ली हिप ३६०’ परिषदेदरम्यान आरोग्यतज्ज्ञांनी हा इशारा दिला आहे, ज्यात ऑर्थोपेडिकतज्ज्ञांनी म्हटले की, तरुणांमध्ये एव्हस्कुलर नेक्रोसिस (-तछ) आणि लवकर हिप डिजनरेशनच्या प्रकरणांमध्ये होणारी वाढ चिंताजनक आहे. ही स्थिती साधारणपणे वृद्ध प्रौढांमध्ये दिसून येते, पण तरुणांमध्येही आता ही स्थिती वाढत असल्याने काळजी घेणं गरजेचे आहे.

यावेळी परिषदेचे आयोजक अध्यक्ष डॉ. एल. तोमर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत तरुणांमध्ये नितंबाशी संबंधित तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. माझ्या ओपीडीमध्ये दर आठवड्याला ३० वर्षांखालील दोन ते तीन रुग्ण नितंबाशी संबंधित तक्रारी घेऊन येतात. ज्यांपैकी बरेच जण २० वर्षांखालील असतात, जे जिम सुरू केल्यापासून सतत नितंब दुखत असल्याची तक्रार करतात. यावेळी तपासणीत अनेकदा एव्हस्कुलर नेक्रोसिसमुळे हा त्रास होत असल्याचे दिसून येते. एव्हस्कुलर नेक्रोसिस हा अशाप्रकारचा त्रास आहे, ज्यात नितंबाच्या हाडांमध्ये योग्यप्रकारे रक्तपुरवठा होण्यास अडचणी येतात, ज्यामुळे हाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त रुग्णांना ॲनाबॉलिक स्टिरॉइडचा वापर किंवा प्रोटीन पावडरच्या अतिसेवनामुळे हा त्रास वाढत असल्याचेही दिसून आले, अशी माहिती दिल्लीतील मॅक्स हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट युनिटचे प्रमुख डॉ. तोमर यांनी दिली.

अलीकडील एका अभ्यासातून असे दिसून आले की, तरुणांमध्ये नितंबाशी संबंधित समस्यांमध्ये वाढ होत असल्यामुळे एव्हीएन होण्याचा धोका वाढतोय, ज्यास अल्कोहोल आणि स्टिरॉइडचा अतिवापर कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे.

अलीकडेच महाराष्ट्र एफडीएने प्रोटीन पावडरवर राज्यव्यापी तपासणी सुरू केली, तेव्हा अनेक ब्रँडचे कार्यक्षमता वाढवणारे स्टिरॉइड्स आढळून आले. त्यापैकी बरेच ब्रँड योग्य लेबलिंग किंवा मंजुरीशिवाय ऑनलाइन किंवा जिममध्ये मोफत उपलब्ध होते. तसेच सोशल मीडियावरही त्याचे खूप प्रमोशन केले जाते.

पण तरुण अशाप्रकारे स्टिरॉइड्स, प्रोटीन पावडरचे सेवन करुन कमी वेळेत मजबूत बॉडी बनवण्याचा नादात नकळतपणे हाडांच्या आरोग्याचे नुकसान करत आहेत. विशेषत: यामुळे हिप जॉइंटच्या फेमोरल हेडला



नुकसान पोहोचवत आहे, असे डॉ. तोमर यांनी निदर्शनास आणून दिले.

हे गंभीर परिणाम माहिती असूनही भारतात शारीरिक कार्यक्षमता वाढवणारे स्टिरॉइड्स आणि प्रोटीन पावडर ऑनलाइन पद्धतीने मोठ्या प्रमाणात विकले जात आहेत.

वरिष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. राजीव जैन म्हणाले की, स्टिरॉइड्सचा गैरवापर किंवा प्रोटीन पावडरच्या अतिसेवनाने हाडांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यावर थेट परिणाम होतो. यामुळे (-तछ) नितंबात वेदना, कडकपणा आणि बधीरपणा येतो, बऱ्याच प्रकरणांमध्ये हिप जॉइंटचे पूर्णपणे नुकसान होऊ शकते. अशावेळी ज्या रुग्णांच्या स्थितीवर औषधोपचार करून उपचार करता येऊ शकतात, त्यांच्यासाठी हिप रिप्लेसमेंट एक चांगला पर्याय असतो, असे डॉ. जैन म्हणाले.

ही स्थिती केवळ वेदनादायकच नाही तर लवकर निदान न झाल्यास ती बरी होण्यासही वेळ घेते. अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये एकमेव उपचार म्हणजे हिप रिप्लेसमेंट. ही एक जटिल प्रक्रिया आहे, जी सामान्यतः वृद्ध रुग्णांसाठी केली जाते. ऑर्थोपेडिक तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारतातील शहरी भागात राहणाऱ्या तरुणांमध्ये हा त्रास सामन्यतः वाढतोय.

परिषदेत ऑर्थोपेडिक संशोधकांनी सादर केलेल्या आणखी एका अभ्यासातून असे दिसून आले की, गेल्या तीन वर्षांत दिल्लीच्या तृतीयक रुग्णालयांमध्ये आढळलेल्या -तछ प्रकरणांपैकी ३० टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये ३५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या रुग्णांचा समावेश होता आणि यामागे स्टिरॉइड इंजेक्शन, स्टिरॉइडचा गैरवापर किंवा अयोग्य आहार हे कारण आहे.

परिषदेचे वैज्ञानिक अध्यक्ष आणि वरिष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. शरद अग्रवाल म्हणाले की, भारतात फिटनेस हा एक ;चांगली कमाई करण्याचा उद्योग बनला आहे, परंतु तो योग्य दिशेने असणे गरजेचे आहे. जिम करून बॉडी बनवणे हेच ध्येय ठेवले जाते, पण असे करताना नकळत तरुण स्नायू आणि हाडांचे आरोग्य खराब करत आहेत. यामुळे आपल्याला तातडीने जागरूकता मोहीम, पूरक बाजारपेठांचे नियमन आणि जिममध्ये मूलभूत ऑर्थोपेडिक स्क्रीनिंगची आवश्यकता आहे, असे डॉ. अग्रवाल म्हणाले.

डॉक्टरांनी फिटनेस प्रशिक्षक आणि जिम मालकांना त्यांच्या क्लायंटना स्टिरॉइड सायकल आणि प्रोटीन सप्लिमेंट्सचा वापर किती प्रमाणात करणे गरजेचे आहे, तसेच त्याच्या सेवनानंतरच्या जोखमींबद्दल शिक्षित करण्याचे आवाहनही वरिष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. शरद अग्रवाल यांनी केले आहे.

# वाळू धक्यावर धाड टाकून ६० लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. सहाय्यक पोलीस अधिक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांची कारवाई.

लातूर :- वाळू धक्यावर धाड टाकून ६० लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. सहाय्यक पोलीस अधिक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांची कारवाई.





याबाबत अधिक माहिती अशी की, दि. १७/०५/२०२५ रोजी शिरुर अनंतपाळ तालुक्यातील मौजे हालकी जवळील शेंद शिवारातील मांजरा नदी पात्रातील वाळूची अवैधरित्या उपसा व वाहतूक होत आहे अशी खात्रीशीर बातमी बी .चंद्रकांत रेड्डी सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग चाकुर यांना मिळाली त्यावरून वरिष्ठांचे मार्गदर्शनात उपविभागीय कार्यालयातील पोलीस अधिकारी अमलदार,पोलीस स्टेशन चाकूर व शिरुर अनंतपाळ येथील अधिकारी अमलदारांची पथके तयार करून नमुद ठिकाणी १७/०५/२०२५ रोजी १९.०० वा.सुमारास बातमीप्रमाणे हालकी जवळील शेंद शिवारातील मांजरा नदी परिसरात छापा असता त्याठिकाणी खालील नमूद आरोपीतांनी संगणमत करून मांजरा नदी पात्रातील वाळू गौण खणिज लोखंडी बोटी व सक्शन पंपाच्या साह्याने बेकायदेशीर शासकीय विनापास परवाना शासनाचे महसूल बुडविण्याच्या उद्देशाने व पर्यावरणाचा रास होईल याची माहिती असताना देखील वाळूचा चोरटा उपसा करून अवैधरित्या चोरटी विक्री करण्यासाठी मौजे शेंद ता. निलंगा शिवारात मोकळ्या जागेमध्ये एकून अंदाजे २० ब्रास वाळू व सदर वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात आलेली ०१ लाखंडी बोट, सक्शन पंपासह ०१ पोकलेन मशीन, ०१ हायवा टिप्पर असे एकून ६०,८०,०००/- याचे मुद्देमालासह मिळून आले. सदर ठिकाणाहून मांजरा नदी पात्रातील वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात आलेली एक लोखंडी बोट,वाळू टिपर मध्ये भरण्यासाठी वापरण्यात आलेली पोकलेन,वाळू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेला हायवा टिप्पर आरटीओ पासींग नं. एम.एच.४७ एस ०६०८ ,बेकायदेशीर रित्या उपसा केलेली वाळू अंदाजे २० ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

आरोपी नामे

बाळू बोडके रा. शेंद ता. निलंगा जि. लातूर, आदित्य बालाजी पाटील, इरफान पठाण रा. निलंगा ता. निलंगा जि.लातूर, ईश्वर पाटील रा. निलंगा ता. निलंगा जि. लातूर, अर्जुनकाशीनाथडेचेरा.औरादशहाजनीता.निलंगाजि.लातूर, पोकलेन चालक

पोकलेन मालक व इतर ६ ते ७ इसम.

यांचे विरुद्ध पोलीस उपनिरीक्षक सुर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे शिरूर अनंतपाळ येथे गुरन १२३/२०२५ कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. व कलम ४८ (७), ४८(८), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनीयम १९६६. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अन्सापूरे पोस्टे शिरुर अनंतपाळ हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस उपनिरीक्षक अच्युत सुर्यवंशी, पोलीस अमलदार शिराज शेख, दिपक सोनकांबळे, सुर्यकांत कोळेकर, लक्ष्मण आरदवाड, रायभोळे, रितेश आंदुरकर, सगर, महादेव फुले. महिला पोलीस अमलदार पुनम शेटे यांनी केली आहे.

# अनिताताई कांबळे यांना २०२५ चाअभया सन्मानपुरस्कार जाहीर

## २४ मे रोजी पुणे येथे भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार!

केज/प्रतिनिधी अनिताताई कांबळे यांना २०२५ चाअभया सन्मानपुरस्कार जाहीर झाला असून दिनांक २४ मे २०२५ रोजी पुणे येथे भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गेल्या अनेक वर्षापासून केज-अंबाजोगाई सह बीड जिल्ह्यामध्ये एकल महिलांच्या प्रश्नावर आवाज उठून सातत्याने पाठपुरावा करून त्यांचे प्रश्न सोडवत आहेत. एकल महिलांच्या प्रश्नावर काम सातत्याने करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अनिताताई कांबळे यांना नुकताच पुणे येथील वंचित विकास संस्थेच्या वतीने २०२५ चाअभया सन्मानपुरस्कार जाहीर झाला आहे. अनिताताई कांबळे या केज, अंबाजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्यात एकल महिलांच्या प्रश्नावर काम करत आहेत त्याच बरोबर त्यांच्या अंकुर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून त्या सामाजिक कार्य करत आहेत त्यांच्या सामाजिक कार्याची संबंध जिल्हाभर ओळख निर्माण झालेली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची पुणे येथील वंचित विकास संस्थेने दखल घेऊन संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२५ च्या अभयापुरस्कारासाठी अनिताताई कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. वंचित विकास सामाजिक संस्था ही गेल्या ३९ वर्षापासून महाराष्ट्रा सह विविध राज्यांमध्ये महिला, मुली-मुले दलित, भटक्या विमुक्त, आदिवासी, शेतमजूर, शेतकरी यांच्यासह विविध वंचित घटकातील नागरिकांसाठी कार्यरत आहे. वंचित विकास या संस्थेच्या अभया मैत्री गटाच्या माध्यमातून मागील १० वर्षापासून ज्या महिला विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण काम करत आहेत अशा महिलांचा अभया सन्मानपुरस्कार देऊन सन्मान करत आहेत. त्या अनुषंगाने यावर्षीचा अभया पुरस्कार सन्मान हा अनिताताई कांबळे यांना नुकताच जाहीर करण्यात आला आहे दिनांक २४ मे २०२५ रोजी ठीक ५-०० वाजता श्रमिक पत्रकार भवन, गांजले चौक पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती वंचित विकास या संस्थेच्या वतीने प्रकल्प समन्वयक मीनाक्षी नवले, संचालक मीना कुर्ले कर, सुनिता जोगळेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



आमच्या प्रतिनिधींनी आनिताताई कांबळे यांच्याशी संपर्क करून चर्चा केली असता प्रतिनिधीशी बोलताना आनिताई कांबळे म्हणाले की, शासनाने संबंध राज्यभर एकल महिलांचा सर्वे करावा एक महिलांचा सर्वे करणे फार गरजेचे आहे. शासनाने तात्काळ एकल महिलांचा सर्वे करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन शासनाने एकल महिलांना न्याय द्यावा अन्यथा एकल महिलांच्या प्रश्नावर राज्यांमध्ये मोठा लढा उभा करणार आहोत.

# कुठल्याही क्षेत्रात नेहमी अपडेट असावे-कमलेश मीना

केज/प्रतिनिधी कुठल्याही क्षेत्रात नेहमी अपडेट राहणे गरजेचे असून री लर्निंग आणि अनलर्निंग हा एक शिकण्याचाच भाग असल्याचे प्रतिपादन आयपीएस कमलेश मीना यांनी व्यक्त केले. ते केज तालुका आयएमएच्या मार्गदर्शन शिबिरामध्ये बोलत होते.




केज तालुका आयएमए च्या वतीने उपजिल्हा रुग्णालयात दि.१६ मे रोजी रात्री ८-०० वाजता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी आयपीएस कमलेश मीना यांच्या हस्ते सदरील शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेंदूविकार तज्ञ अंकुश मैंदाड यांची उपस्थिती होती. यावेळी कमलेश मीना यांनी क्षेत्र कुठलेही असले तरी नेहमी अपडेट असावे आणि शिकण्याची प्रक्रिया ही सुरूच राहिली पाहिजे असे मत व्यक्त केले. तर मेंदू विकार तज्ञ अंकुश मैंदाड यांनी लहान मुलांच्या मेंदू विकारावर सखोल मार्गदर्शन करत लहान मुलांना येणाऱ्या झटक्यांचे निदान कसे करावे याबद्दल उपस्थित डॉक्टर्सना मार्गदर्शन केले. तर आयएमएचे केज तालुकाध्यक्ष डॉ. दिनकर राऊत यांनी लहान मुलांच्या खोकल्याच्या समस्या, निदान, उपचार आणि याबाबत पालकांची भूमिका काय असावी याबद्दल मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमासाठी आयएमएचे सचिव डॉ. भाऊसाहेब चाळक, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष डॉ. वसुदेव नेहरकर, सचिव डॉ. उमाकांत मुंडे, उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन राऊत यांच्यासह तालुक्यातील डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. दरम्यान केज तालुका आयएमएचे अध्यक्षपद डॉ. दिनकर राऊत यांच्याकडे आल्यापासून मागच्या काही महिन्यांमध्ये सातत्याने डॉक्टरसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येत असून याचा फायदाही डॉक्टर्सना उपचार करताना होताना दिसत आहे.

# राज्य महामार्गाच्या कामासाठी वृक्षांची केली कत्तल वटवृक्षाची कत्तल झाली त्याजागी रोपांची लागवड कधी होणार?

तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नवीन चार रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.अन्यथा दळणवळणासाठी केलेला विकास हा माणसांना भकास करेल,या पावसाळ्यात तात्काळ रोपांची लागवड न झाल्यास अन्नत्याग सत्याग्रह करणार आहे.
वृक्षमित्र डॉ.हनुमंत सौदागर केज




केज/प्रतिनिधी सध्या सर्वत्र महामार्गाचे काम धावत्या गतीने सुरू आहे . अंबाजोगाई केज बीड या मार्गे जाणाऱ्या महामार्गाचे काम करण्यासाठी महाकाय वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. यावेळी वृक्षाच्या मनातील भावना म्हणजे मज जगवायचे राहून गेले अशी म्हणून त्या भल्यामोठ्या वटवृक्ष आणि आपले डोळे मिटले आहेत त्यांना पुनर्जीवित करता आले असते रस्त्याच्या बाजूला पुनर्रोपण करता आले असते मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा रोपांची लागवड करण्यात येणार असा फतवाही निघाला मात्र प्रत्यक्षदर्शी अद्यापपर्यंत कोणतेही रोप लावले गेले नाही यामुळेच विकासाकडे जाणारे महामार्ग हे विनाशाकडे जातात की,काय?असा प्रश्न निसर्ग प्रेमींमध्ये निर्माण झाला आहे वृक्षाचे पुनर्जीवन करावे व रस्त्याच्या दुतर्फा हा रस्त्याची लागवड करावी अशी मागणी केली जात आहे. सध्या रस्त्याच्या बाजूला अनेक मोठ्या झाडांचे अवशेष पडलेले आहेत मुख्यत्वेकरून वटवृक्ष नामशेष झाले आहेत त्याचे पुनर्जीवन करता आले असते परंतु याकडे मात्र कोणी लक्ष घातलेच नाही मागील काही वर्क वर्षापूर्वी लातूरमध्ये वटवृक्षाचे पुनर्रोपण करण्याचा प्रयोग यशस्वी झाला होता असाच उपक्रम करून अनेक वृक्षांचे संगोपन करता आले असते मात्र याचे कोणास देणेघेणे नाही सध्या सर्वत्र वृक्षतोड खुलेआम चालू आहे वनीकरण विभाग पाहतो आहे वृक्षलागवड केवळ कागदावरच होते शतकोटी वृक्ष लागवडीचा बोजवारा उडालेला सर्वश्रुत आहे.

या प्रकरणी वृक्ष मित्रांनी यासाठी मंत्रालयात मागणी केली मात्र याकडे कोणी लक्ष घातले नाही परिणामतः सर्व वृक्षांची कत्तल झाली आहे सध्या रस्त्याच्या दुतर्फा या वृक्षांचे अवशेष पडलेले आहेत याकडे बघून नवी पालवी कधी फुटणार कधी उगवणार आणि पर्यावरणाचे संवर्धन कधी होणार असा प्रश्न उभा आहे याची दखल घेऊन वृक्षलागवड तत्काळ व्हावी अशी मागणी केली जात आहे रस्त्याच्या कडेला असलेले भलेमोठे वृक्ष तोडण्यात आले झाडांच्या कत्तली झाल्या त्याच्या बदल्यात झाडे लावण्याची जबाबदारी गुत्तेदार, प्रशासन की नेमकी कोणाची हा प्रश्न अनुत्तरित आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती आधी पाकिस्तानला का देण्यात आली ? ; राहुल गांधींचे मोदी सरकारला तिखट सवाल

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर प्रश्न उपस्थित केले आहेत. राहुल गांधी यांनी यांनी आज पत्रकार परिषद घेत सरकारला घेरले. यावेळी त्यांनी,जयशंकर स्वतः म्हणत आहेत की पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर हल्ला करण्यापूर्वी त्यांनी पाकिस्तानला माहिती दिली होती. ही राजनयिकता नाही, ही हेरगिरी आहे. असा गंभीर आरोप देखील त्यांनी केला. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी, काही हेरांना अटक करण्यात आल्याची बातमी होती पण नंतर लपवाछपवी सुरू झाली असे म्हटले. राहुल गांधींनी यावेळी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांना प्रश्न विचारत, पाकिस्तानला माहिती दिल्यामुळे आपण किती भारतीय विमाने गमावली? हा गुन्हा आहे आणि देशाला सत्य कळले पाहिजे. असे म्हटले. तसेच अलिकडेच राहुल गांधी यांनी परराष्ट्रमंत्र्यांच्या एका विधानाबाबत प्रश्न उपस्थित केला होता की ऑपरेशन सिंदूरची माहिती आधी पाकिस्तानला का देण्यात आली ?तसेच, परराष्ट्र मंत्रालयाने यावर एक निवेदन जारी करत ,राहुल गांधी चुकीचे तथ्य सादर करत आहेत.असे म्हटले होते. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनीही केंद्र सरकारला घेरले पवन खेरा यांनीही केंद्र सरकारवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, काल बातमी आली की काही हेरांना अटक करण्यात आली आहे आणि मग गुप्तहेर सुरू होतात. ही कसली हेरगिरी आहे? मोदीजी गुजरातचे मुख्यमंत्री असताना ते म्हणायचे की समस्या सीमेवर नाही, समस्या दिल्लीत आहे.

## माजलगाव येथे सामाजिक न्यायमंत्री ना.संजय सिरसठ यांच्या नागरी सत्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-लखन हजारे

केज/प्रतिनिधी माजलगाव येथे सामाजिक न्यायमंत्री ना. संजय सिरसठ यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे तरि केज शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्च्याचे केज तालुकाध्यक्ष लखन हजारे यांनी केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,राज्याचे सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदि निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसठ यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दिनांक २४ मे २०२५ रोजी दुपारी ठिक ४-०० वाजता जूना मोंढा येथे बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.



तरि या कार्यक्रमास केज तालुक्यासह शहरातील युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्च्याचे केज तालुकाध्यक्ष लखन हजारे यांनी केले आहे. या कार्यक्रमास बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित, शिवसेनेच्या नेत्या हर्षदा सिरसठ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विविध उपक्रमांनी व मोठ्या उत्साहात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसठ यांचा नागरी सत्कार संपन्न होणार आहे.

# महात्मा जोतिबा फुलेंच्या पुतळ्यास संरक्षण देण्याची मागणी..!

## बहुजन समाजाच्या वतीने दिले निवेदन

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे बहुजन समाजाच्या वतीने बसवण्यात आलेल्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना होऊ नये यासाठी प्रशासनाने सदरील पुतळ्यास संरक्षण देण्याची मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे सार्वजनिक जागेमध्ये बहुजन समाजाच्या वतीने दिनांक १२ मे रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा अर्धाकृती पुतळा बसवण्यात आला आहे. सदरील जागा ही कुणाच्या खाजगी मालकीची नाही. मात्र गावातील काही जणांनी सदरील पुतळ्याच्या समोरच पत्र्याचे शेड उभारण्याचा प्रयत्न सुरू केला असून रहदारीसही मोठा अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच पुतळ्याची विटंबना होण्याचीही शक्यता आहे. येणाऱ्या पिढीला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आत्मसात होण्यासाठी अशा महापुरुषांच्या पुतळ्यांची आवश्यकता लक्षात घेऊन महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. मात्र गावातीलच काही लोकांनी त्याला विरोध दर्शवत पत्र्याचे शेड उभा करण्याचा प्रयत्न सुरू केला असून यामध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक दरी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने सदरील बाबीची गंभीर दखल घेऊन अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी व सदरील पुतळ्यास संरक्षण द्यावे अशी मागणी यावेळी एका निवेदनाद्वारे केली आहे. सदरील निवेदनावर मेजर राम राऊत, सचिन राऊत, प्रमोद राऊत, सोमनाथ काळे, रामेश्वर राऊत, सुहास शिंदे, बालाजी राऊत, नितीन राऊत, दत्ता काळे, सूर्यकांत मावकर यांच्यासह अन्य ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE